Exh.26

# नेवासा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब ज्यु.डी.

# यांचे कोर्टात




**रे.मु.नं.**

**209/2025**

**वादी**

अनिल हेमराज

**प्रतिवादी**

धनराज जसराज वगैरे

**या कामी वादी तर्फे सि.पी.सी. ऑर्डर 6 रुल 17 प्रमाणे दुरुस्तीचा अर्ज असे तो खालीलप्रमाणे.**

सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द जाहिर ठरावासाठी व निरंतर ताकिद मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे.

सदर दाव्यातील प्रतिवादी नं.2 व 3 हे हजर होऊन त्यांनी कैफियत व सी.पी.सी. ऑर्डर 7 रुल 11 चा अर्ज दाखल केला आहे.

सदर दाव्यात प्रतिवादी यांनी सदरचा दावा चालू असतांना दावा कलम 1ब चे नुकतेच म्हणजेच दिनांक 16/06/2025 रोजी हस्तांतरण केले असुन खरेदी घेणार प्रतिवादी नं.1 व भाग्यश्री किरण भंडारी यांना हस्तांतर केले असल्याने सदर दाव्यात खालीलप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

सदर दाव्यात नि.नं. 1 वर प्रतिवादी नं.4 नंतर नविन प्रतिवादी नं.5 म्हणुन खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

“प्रतिवादी नं.5 भाग्यश्री किरण भंडारी, वय-48 धंदा घरकाम रा.बंगलो नं.21, पार्श्वनाथ को-ऑफ हौसिंग सोसायटी, नाशिक फाटा जवळ, कासारवाडी पुणे-411034”

Order

---------------------------

Issue notice to def. & proposed def.

SANDHYA YUVRAJ SUL Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL Date: 2025.07.17 17:53:20 +0530

2nd Jt.CJJD Newasa

Order

---------------------------------------------------------------------------------------------

As per report of Exh.35 notice duly served to proposed def. no. 5. But he failed to appear & file his say. Also, def. no. 1 to 3 failed to file their say. Hence, proceed without say.

SANDHYA YUVRAJ SUL Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL Date: 2025.09.19 18:14:00 +0530

2nd Jt.CJJD Newasa

तसेच दावा 7 च्या खाली नविन 7अ म्हणुन खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

“ 7अ) सदरचा दावा चालू असतांना प्रतिवादी नं.2 व 3 यांनी दावा कलम 1ब ही मिळकत प्रतिवादी नं.1 व प्रतिवादी नं.5 यांना तारीख 16/06/2025 रोजी दस्त क्रमांक 4010/2025 नुसार बेकायदेशीर हस्तांतर केले असुन सदरचे हस्तांतर हे वादीवर बंधनकारक राहु नये यासाठीही सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.”

तसेच दावा कलम पॅरा 13 मध्ये विनंती कलम अ च्या खाली नविन अअ म्हणुन खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

“ अअ) दावा कलम 1ब या मिळकतीचे प्रतिवादी नं.2 व 3 यांनी प्रतिवादी नं.1 व 5 यांना तारीख 16/06/2025 रोजी दस्त क्रमांक 4010/2025 हे वादीवर बंधनकारक राहु नये असा जाहिर ठराव मा.कोर्टाने करावा.”

तसेच दावा कलम पॅरा 13 मध्ये विनंती कलम अअ च्या खाली नविन अअअ म्हणुन खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

“ अअअ) सदर दाव्यातील प्रतिवादी नं.1 व 5 यांनी दावा कलम 1अ च्या कब्जेवहिवाटीस बेकायदेशीर हरकत करु नये व दावा कलम 1ब चे कोणासही कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये असा निरंतर ताकिद मनाई हुकुम प्रतिवादी नं.1 व 5 विरुध्द देववावा.”

वर नमुद केलेप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. सदरच्या अर्जात वादींनी कोणतिही नविन माहिती घातलेली नाही अगर प्रतिवादींना आश्चर्यकारक अशी केस निर्माण होत नाही. दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सदरची दुरुस्ती ही नैसर्गिक व प्रासंगिक आहे त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने सदरची दुरुस्ती करणे अत्यावश्यक झालेले आहे. सदरची दुरुस्ती ही

प्रतिवादींनी केलेल्या बेकायदेशीर हस्तांतरणाचे व्यवहारामुळे करणे गरजेचे व आवश्यक झालेले आहे.

तरी मे.कोर्ट साहेबांना नम्र विनंती की, वादीचा सदरचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजुर करण्यात यावा. वर नमुद केलेप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी. तरी अर्ज मंजुर व्हावा हि नम्र विनंती. सोबत ॲफिडेव्हिट दिले आहे.

**नेवासा**

**दिनांकः- 15 /07/2025** **वादी**

**वादी तर्फे ॲडव्होकेट**